# Sale Notice

## Tirupati Commodities Impex Private Limited

## (CIN: U51420MH2005PTC156397) (In Liquidation)

Registered Office: Office No. 901, 9th Floor, Lodha Supremus, Senapati Bapat Marg, Lower Parel, Mumbai, Maharashtra-400013.

### E-Auction

### Sale of Assets under Insolvency and Bankruptcy Code, 2016

### Date and Time of Auction: 10th October 2022 from 3.00 p.m. to 5.00 p.m.

Sale of Assets and Properties owned by Tirupati Commodities Impex Private Limited (in Liquidation) forming part of Liquidation Estate of Tirupati Commodities Impex Private Limited in possession of liquidator appointed by the Hon'ble National Company Law Tribunal, Mumbai Bench on 01st October, 2019 (Order published on 01st November, 2019). The sale of properties will be done by the undersigned through the e-auction platform https://www.bankeauctions.com of M/s. C1 India Private Limited.

| Description of Assets | Reserve Price | Lot No. | Earnest Money Amount |
|---|---|---|---|
| Financial Assets by way of assignment (Debtors, advances and other financial assets) | Rs. 70,00,000/- (Rs. Seventy lakhs Only) | 1 | **Rs. 7,00,000/- (Rs. Seven Lakhs only)** |

**Terms and Condition of the E-auction are as under**

1. Earnest Money can be deposited till 07th October 2022 at 5 P.M.
2. E-Auction will be conducted on "AS IS WHERE IS BASIS, AS IS WHAT IS BASIS, WHATEVER THERE IS BASIS, NO RECOURSE BASIS" on E-auction service provider M/S C1 India Private Limited.
3. The Process Memorandum containing complete E-Auction process details of the Assets, online e- auction Bid Form, Declaration and Undertaking Form, Terms and Conditions for online auction sale are available on website https://www.bankeauctions.com. The Process Memorandum is an integral part of the sale of above-mentioned assets via Auction and is final document in terms of all the legal and commercial terms and conditions.
4. For eligibility and detailed terms & conditions send email at liqoffice.tcipl@gmail.com and vikas.gupta@bngca.com Contact 8956566516.

**Date** : 30.09.2022
**Place** : Nagpur

**Vikas Prakash Gupta - Liquidator**
**(Tirupati Commodities Impex Private Limited)**
Regd.No.: IBBI/IPA-001/IP-P00501/2017-18/10889
Add-G-19, Shreewardhan Complex, Mezzanine Floor, Beside Landmark Building, Ramdaspeth, Wardha Road, Nagpur-440010
**Email**-vikas.gupta@bngca.com,liqoffice.tcipl@gmail.com
**AFA valid up to 01-02-2023**

संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

॥ न मे भक्त प्रणश्यति ॥

# ड्रग्जचा ड्रॅगॉन आणि ऑपरेशन गरुडा

देशाच्या सर्व भागांत प्रचंड प्रमाणावर अमली पदार्थांचा व्यापार वाढतो आहे. ज्या वेगाने ड्रग्ज किंवा त्यासंबंधातले वेगवेगळे अमली पदार्थ वेगवेगळ्या नावाने अगदी खेड्यापाड्यापर्यंत पोहोचत आहे. ते पाहिल्यावर ड्रग्जचा हा ड्रॅगॉन वेळीच आवरला पाहिजे यात काही शंका नाही. गेल्या तीन महिन्यांमध्ये देशाच्या विविध भागांत जवळपास पंचवीस हजार कोटींचे अमली पदार्थ जप्त झाले. अगदी गेल्या आठवड्यातसुद्धा न्हावा-शेवा बंदरामध्ये गेल्या वर्षभरापासून पडून असलेल्या कंटेनरमध्ये बाराशे कोटींचे ड्रग्ज सापडले. आणि गेल्याच महिन्यात गुजरातच्या समुद्रकिनाऱ्यावर किमान हजार कोटींचे अमली पदार्थ जप्त केले गेले होते. मुंबईच्याही अनेक भागांमध्ये छोट्या मोठ्या प्रमाणावर शंभर ते दीडशे कोटींचे ड्रग्ज पोलिसांनी हस्तगत केले. त्यासंदर्भात आम्ही याच स्तंभातून असा उल्लेख केला होता की, केंद्र सरकारने केवळ बघ्याची भूमिका घेऊ नये. मादक पदार्थ किंवा ड्रग्जचे हे विषारी जाळे नेस्तनाबूत करायचे असेल तर राष्ट्रव्यापी मोहीम राबवावी लागेल. आणि आता केंद्र सरकारने अशी सीबीआयच्या नेतृत्वाखाली ऑपरेशन गरूडा ही मोहीम राबवली होती. एकाचवेळी देशातल्या अनेक भागांत छापेमारी केली गेली. तब्बल ६ हजार ६०० संशयितांची चौकशी झाली. त्यापैकी १७५ लोकांना अटक करून सव्वाशे नवे गुन्हेही नोंदवले गेले आहेत. महाराष्ट्र, पंजाब, दिल्ली, हिमाचल प्रदेश, गुजरात आणि मणिपूर या राज्यांमध्ये विशेष मोहीम राबवली गेली. इंटरपोलकडून यासंदर्भात काही विशेष माहिती भारतीय गुप्तचर यंत्रणांना दिली गेली होती. म्हणूनच अमली पदार्थविरोधी विभाग आणि राज्य सरकारच्या सहाय्याने हे ऑपरेशन गरुडा राबवले गेले. इतक्या मोठ्या प्रमाणावर आणि एकाचवेळी मोहीम राबवली गेली आहे. ज्यामधून आता अनेक नवे धागेदोरे हाताशी लागत आहेत. त्यातून काही पांढरपेशे किंवा स्वतः ला प्रतिष्ठित म्हणून मिरवून घेणारे अनेक लोक तसेच काही राजकीय नेते यांचादेखील संबंध उघड होऊ शकतो.

### कायमची नाकेबंदी हवी

या व्यवसायासाठी भारतात प्रामुख्याने अनेक परदेशी नागरीक काही स्थानिकांच्या मदतीने हा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर करतात. हे सगळे अमली पदार्थ समुद्रमार्गे भारतात आणले जातात. गेल्या दोन महिन्यांपासून गुजरात आणि महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर अमली पदार्थांचे साठे जप्त केले गेले आहेत. याचाच अर्थ आंतरराष्ट्रीय स्तरावरचा ड्रग माफिया भारतावर अधिक लक्ष केंद्रीत करताना दिसून येतो. आणि केवळ शहरेच नव्हे तर खेड्यापाड्यापर्यंत हे अमली पदार्थ पोहोचवण्याची नियोजनबद्ध साखळी आखलेली पाहायला मिळते. गांजा, चरस, किंवा ब्रफोमाईनसारख्या गोळ्या, इंजेक्शन, असा विविध प्रकारचा अमली पदार्थांचा व्यापार छुप्या पद्धतीने केला जातो आहे. अलिकडच्या काळात इलेक्ट्रीक सिगारेटसारख्या माध्यमातूनही हे नशिले पदार्थ शालेय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्याचे कारस्थान राबवले जाते आहे. उत्सुकतेपोटी या इलेक्ट्रीक सिगारेटचे आकर्षण या शालेय विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होते. त्यातूनच ही मुलं ड्रग्जच्या विळख्यात ओढली जातात. मुंबईच्या पश्चिम उपनगरामध्ये अनेक शाळांच्याभोवती ड्रग्ज माफियांचा गराडा असल्याच्या तक्रारी झाल्या होत्या. केवळ बॉलिवूड किंवा मनोरंजन क्षेत्रच नव्हे तर महाविद्यालय किंवा त्यांचे हॉस्टेल्स अशा ठिकाणीसुद्धा जाणीवपूर्वक ड्रग्जची विक्री केली जाते. काही महत्त्वाच्या रेल्वे स्टेशन्सवरही छुप्या पद्धतीने ड्रग्ज उपलब्ध असतात. याचा अर्थ गर्दीची जेवढी काही ठिकाणं आहेत, तिथे तिथे ड्रग्जचा व्यापार जाऊन पोहोचला आहे. ज्याअर्थी गुप्तचर यंत्रणांना साडेसहा हजारांपेक्षा जास्त संशयितांची चौकशी करण्याची वेळ आली याचाच अर्थ या व्यवसायात गुंतलेल्यांची संख्या त्याच्या शंभरपट असण्याची शक्यता नाकारता येत नाही. राष्ट्रीय स्तरावर एकाचवेळी राबवलेल्या या पहिल्या धडक ऑपरेशनमध्ये पोलिसांच्या हाती लागलेला मुद्देमाल आणि काही आरोपी याची संख्या पाहता भारतासारख्या देशात फोफावत असलेले हे विष धोकादायक पातळीपर्यंत पोहोचले आहे असे समजायला हरकत नाही. गुप्तचर यंत्रणांनी आता केवळ तेवढ्यावरच थांबू नये. तर ज्या ज्या मार्गांनी ड्रग्ज येतात किंवा अमली पदार्थ येतात त्याची कायमची नाकेबंदी करावी. शिवाय ज्या देशातून हे अमली पदार्थ मोठ्या प्रमाणावर येतात त्या त्या देशाशी संपर्क साधून या व्यापाराचा पायबंद करण्याची गरज आहे.

### अक्षम्य बेफिकीरी

गेल्या काही महिन्यात महाराष्ट्र आणि गुजरातच्या किनाऱ्यावर विशेष पाळत ठेवली गेली. आणि हजारो कोटींचा अमली पदार्थ जप्त केले गेले. या दोनच ठिकाणी अधिक प्रमाणात येऊन धडकणारे अमली पदार्थ हा एक विशेष तपासाचा भाग ठरू शकतो. कारण स्थानिकांच्या मदतीशिवाय हे घडू शकत नाही. ड्रग्ज माफियांच्या दृष्टीने महाराष्ट्र किंवा गुजरातची किनारपट्टी हे सेफ झोन असू शकतो. आणि त्याला संरक्षण देणारे नेमके कोण कोण लोक आहेत, याचाही पाठपुरावा झाला पाहिजे. मुंबईतले मनोरंजन क्षेत्र शिवाय इतर मोठमोठ्या हॉटेल्समधूनसुद्धा किंवा हुक्का पार्लरमधूनसुद्धा अमली पदार्थ छुप्या पद्धतीने पुरवले जातात. मुंबईतील अशा हॉटेल्सचे प्रमाण मनोरंजन क्षेत्रातला ड्रग्जचा धुमाकूळ, शिवाय मुंबईत येऊन स्थायिक होणारे अनेक परदेशी नागरीक या सर्वांचेच प्रमाण अधिक आहे. म्हणूनच महाराष्ट्र आणि गुजरातच्या किनारपट्टीवर ड्रग्जची तस्करी जास्त प्रमाणात होताना दिसते. या ऑपरेशन गरूडानंतर स्थानिक पातळीवर अधिक दक्षता गरजेची ठरते आणि सातत्याने याचे जाळे शोधून काढणे क्रमप्राप्त ठरते. जेएनपीटी बंदरात एखादा कंटेनर येतो आणि तो वर्षभर पडून राहतो. त्यामध्ये कोट्यवधीचे अमली पदार्थ सापडतात. यावरून अक्षम्य स्वरूपाची बेफिकीरीच दाखवली जाते. अशा बेफिकीरीला जबाबदार असणाऱ्यांनासुद्धा जाब विचारला गेला पाहिजे. अन्यथा ऑपरेशन गरुडासारखे कितीही मोहिमा राबवल्या तरी त्याचा अपेक्षित परिणाम साधला जाणार नाही.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी.
मोबा.९४२२४२०६११

स्वतःच्या वेदनेची जाणीव होणे हे जिवंत असल्याचं लक्षण आहे. तर दुसऱ्याच्या वेदनेची जाणीव असणे हे माणुसकीचं लक्षण आहे.

## पंचांग

**शनिवार १ ऑक्टोबर, २०२२**
**शक १९४४ शुभकृत्‌नामसंवत्सर**

**अश्विन शुक्ल षष्ठी * नक्षत्र : ज्येष्ठा**

रवी उदय- ०६-३०
रवी अस्त- १८-२६

-: जन्मराशी :-
००-०१ ते २४-०० वृश्चिक

**शुक्राचा पहाटे पूर्वेला अस्त;**
**ज्येष्ठ नागरिक दिन, रक्तदान दिन**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ता: प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे**

संपर्क - जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
वितरण विभाग : ९५९४९३६४४१ छोट्या जाहिराती: ८४२२८१७४४५.
ई-मेल navakal.1923@gmail.com
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande**

## पाककृती

### राजगिरा आणि बटाट्याचे थालिपीठ



★ **साहित्य :-** २ उकडलेले बटाटे, राजगिऱ्याचे १ वाटी पीठ, २ हिरव्या मिरच्या (तिखट तुमच्या आवडीप्रमाणे), मीठ, साखर, तूप.

★ **कृती -** उकडलेल्या बटाट्याची साले काढून ते कुस्करून घ्यावेत. त्यामध्ये राजगिऱ्याचे पीठ, हिरवी मिरची, मीठ, चिमूटभर साखर, थोडेसे तूप घालून मीठ व्यवस्थित मळून घ्यावे.

त्यानंतर त्याने गोळे करावेत. बटर पेपरला तूप लावा आणि त्यावर हे थालिपीठाप्रमाणे थापा आणि मध्ये एक छिद्र पाडा. तवा मध्यम आचेवर ठेवावा. त्यावर तूप सोडावे आणि वरून थालिपीठ लावावे.

मंद गॅसवर हे थालिपीठ खमंग भाजा. तयार झाल्यावर दही अथवा शेंगदाण्याच्या उपवासाच्या चटणीसह खायला द्या.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेचा शुभारंभ

■ अहमदाबाद

३६ व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेला प्रारंभ झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अहमदाबादच्या मोदी स्टेडियमवर या स्पर्धेचा शुभारंभ झाला. कार्यक्रमात मोदींनी स्वर्णीम गुजरात युनिव्हर्सिटीचे व्हर्च्युअल उद्घाटन केले. यावेळी पंतप्रधानांनी खेलसे जुडेगा इंडिया, जीतेंगा इंडिया अशी घोषणा दिली. गुजरातच्या सहा शहरांमध्ये ही स्पर्धा खेळवली जाणार आहे.

## विजू पेणकर कौतुक सोहळा

■ मुंबई

**महाराष्ट्राच्या** शरीरसौष्ठवातील पितामह म्हणून ओळखले जाणारे विजू पेणकर यांनी महाराष्ट्रासाठी जिंकलेल्या पहिल्या वहिल्या 'भारत श्री' किताबाला उद्या शनिवारी १ ऑक्टोबरला पन्नास वर्षे पूर्ण होत आहे. यानिमित्ताने मराठी क्रीडा पत्रकार संघातर्फे विशेष कौतुक सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. माझगाव येथील सर एलीकदुरी शाळेत उद्या शनिवारी सकाळी ११ वाजता हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी जागतिक शरीरसौष्ठव संघटनेचे महासचिव चेतन पाठारे, विक्रम रोठे, मुंबई शरीरसौष्ठव संघटनेचे राजेश सावंत, पत्रकार संघाचे अध्यक्ष सुभाष हर्चेकर, मंगेश वरवडेकर उपस्थित राहणार आहेत.

## मुश्ताक अली चषकासाठी मुंबईचा संघ जाहीर झाला

■ मुंबई

**मुश्ताक** अली चषकासाठी मुंबईचा संघ जाहीर झाला आहे. अजिंक्य राहणे या संघाचे नेतृत्व करणार आहे तर पृथ्वी शॉ, शार्दूल ठाकूर आणि यशस्वी जैस्वाल यांची संघात वर्णी लागलेली आहे.अजिंक्य राहणे (कर्णधार), यशस्वी जायसवाल, पृथ्वी शॉ, सरफराज खान, शार्दुल ठाकुर, शम्स मुलानी, तनुश कोटियन, हार्दिक तमोर, प्रशांत सोलंकी, धवल कुलकर्णी, तुषार देशपांडे, शिवम दुबे, अमन खान, साईराज पाटिल, मोहित अवस्थी, असा मुंबईचा संघ असणार आहे आणि हा संघ निश्चितपणे ट्रॉफी जिंकेल, असा विश्वास राहणेनी व्यक्त केला.

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**
**पाणीपुरवठा विभाग**
स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता.जि.ठाणे, ४०१ १०१. वेबसाईटः www.mbmc.gov.in
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/पापु/३०/२०२२-२३ दि. : ३०/०९/२०२२

**॥ जाहीर निविदा सूचना ॥**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील विविध कामांसाठी ऑनलाईन निविदा मागविणेत येत आहेत. निविदा सुचना व निविदा प्रपत्र http://mahatenders.gov.in च्या संकेतस्थळावर दि. ०७/१०/२०२२ ते दि.३१/१०/२०२२ रोजी १२.०० वाजेपर्यंत उपलब्ध राहणार आहेत. http://mahatenders.gov.in च्या संकेत स्थळावर दि.३१/१०/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.
**"१०० टक्के मतदान ! हिच लोकशाहीची शान!"**

जा.क्र.मनपा/जनसंपर्क/२७७/२०२२-२३

सही/-
कार्यकारी अभियंता
पाणीपुरवठा विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका

ठिकाणः भाईंदर
दिनांकः- ३०/०९/२०२२

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, (सा.बां.वि.) यांचे कार्यालय**
☎ २२०१६९७५
२२०१६९७३
Email : presidency.ee@mahapwd.gov.in

**ई -निविदा सूचना क्र. ४६ सन २०२२-२०२३**

कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई (दुरध्वनी क्रमांक-२२०१६९७५ /२२०१६९७७) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामाकरीता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, इलाखा शहर विभाग, मुंबई यांनी राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु. लक्ष |
|---|---|---|
| १. | उच्च न्यायालय मुंबई येथील पीडब्ल्युडी मुख्य व विस्तार इमारतीच्या पाईपलाईन, लाकडी पार्टीशन, फ्लोरींग दुरुस्ती करणे. | १७.६२ |
| २ | एन डी रोड मुंबई येथील शासकीय बंगला देवगिरी मध्ये प्लास्टर, रंगकाम शटर दुरुस्ती पार्टीशन इ. कामे करणे. | ४८.२५ |
| ३ | चर्चगेट मुंबई येथील शासकीय इमारत सागर, तुषार फ्लोरींगचे नुतनीकरण करणे. | २०.९४ |
| ४ | मंत्रालय मुंबई विस्तार इमारतीमधील सहकार पतन व वस्त्रोद्योग विभाग कार्यालय रुम नं ३३४ चे नुतनीकरण करणे. | २६.८४ |
| ५ | एन डी रोड मुंबई येथील अवंती इमारतीच्या सदनिकांचे अंतर्गत प्लास्टर व रंगकाम करणे. | १९.९९ |
| ६ | जुने सचिवालय इमारत मुंबई येथील विविध कोर्ट चेंबर्स आणि कार्यालय अंतर्गत रंगकाम करणे. | १९.९६ |
| ७ | आकाशवाणी आमदार निवास मुंबई इमारतीमधील फॉल्स सिलिंग पॅनलिंग दुरुस्ती करणे. | १३.२४ |
| ८ | नविन विधानभवन मुंबई डोम इमारतीच्या पूर्व बाजु टेरेस वॉटरप्रुफींग करणे | १४.८४ |
| ९ | नविन विधानभवन मुंबई टॉवर इमारतीमधील अधिकारी दालने दुरुस्ती करणे. | १७.६७ |
| १० | मलबार हिल मुंबई येथील शासकीय बंगला नंदनवन येथील सेवकनिवास स्थाने दुरुस्ती, किचन आणि पार्कीग शेड बांधणे. | ४२.०४ |
| ११ | मलबार हिल मुंबई येथील शासकीय बंगला अग्रदुत आणि नंदनवन सेवक निवासस्थाने पोलीस सिक्युरिटी रुम दुरुस्ती आणि फर्निचरचे काम करणे. | ४१.८४ |

ई-निविदा उपलब्ध कालावधी- दि. ३.१०.२०२२ ते दि. १७.१०.२०२२ पर्यंत.
ई-निविदा उघडणे- दि. १८.१०.२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता
निविदा सुचनेमध्ये काही बदल/सुधारणा करावयाची असल्याचे शुध्दीपत्रक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात येणार नाही. त्याबाबत सर्व बदल ऑनलाईन निविदा प्रक्रियेमध्ये प्रसिध्द केले जाईल.
खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
1) www.mahapwd.com 2) http://mahatenders.gov.in
जा.क्रं. इशवि/निलि/९६६४
कार्यकारी अभियंता इलाखा शहर विभाग,
मुंबई यांचे कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग,
२ रा मजला,बांधकाम भवन,
२५ मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१.
दिनांक : २२/९/२०२२
क्रमांकः आरओसी-२०२२-२३/क्र.५/ सी ३१३४

सही/-
(सी.टी. नाईक )
कार्यकारी अभियंता,
इलाखा शहर विभाग, मुंबई.

**मध्य रेल्वे**
**सामग्रीच्या प्रापणाकरिता**
**निविदा सूचना क्र. २४/२०२२-२३ दि. २३.०९.२०२२**

भारताचे राष्ट्रपतींकरिता आणि त्यांच्या वतीने वरि. विभागीय सामग्री व्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई विभाग, मुंबई, सीएसएमटी-४००००१ खालील बाबींच्या पुरवठ्याकरिता इलेक्ट्रॉनिक निविदा मागवित आहेतः **अ. क्र.**: १. **निविदा क्र.**: ९२.२२.५९०४. **वर्णन**: मध्यवर्ती सर्व्हरसह शरीरावर धारण करावयाचा ४जी लाईव्ह कॅमेरा (सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर), तपशीलवार वर्णन सोबत जोडले आहे. (संस्थेने तांत्रिक तपशील अनुपालन अपलोड करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचे प्रस्ताव ताबडतोब फेटाळण्यात येतील.) **परिमाण**: ४० नग. **ईएमडी रक्कम**: ₹५२,४४०/-; **नियत दिनांक**: ०९.११.२०२२; **टीपा**: १. वरील निविदा आयआरईपीएस वेबसाईट म्हणजेच **www.ireps.gov.in** वर अपलोड करण्यात आल्या आहेत. ज्या संस्था वरील ई-निविदेमध्ये सहभागी होण्यास इच्छुक आहेत, त्यांनी स्वतःची वरील वेबसाईटवर इलेक्ट्रॉनिक पद्धतीने नोंदणी करण्याचा सल्ला देण्यात येतो. या ई-निविदांकरिता व्यक्तिशः प्रस्ताव स्वीकारण्यात येणार नाहीत. २. बोलीदारांनी आयआरईपीएस द्वारे ईएमडीचा ऑनलाईन भरणा करावयास हवा. ३. या निविदा आणि इतर प्रशासकीय शर्तींच्या तपशिलाकरिता, कृपया वेबसाईट **www.ireps.gov.in** ला भेट द्या. ४. कोणत्याही चौकशीसाठी, कृपया वरि. विभागीय सामग्री व्यवस्थापक, मध्य रेल्वे, डीआरएम कार्यालय, मुंबई सीएसएमटी-४००००१, ई-मेल **srdmm@bb.railnet.gov.in** येथे लिहावे. ५. टीपः सदर निविदा दिनांक १५.०६.२०१७ रोजीच्या निविदा सार्वजनिक प्रापण धोरण आदेश २०१७ चे अनुपालन करते.

**वरि. विभागीय सामग्री व्यवस्थापक**

**रेलमदत हेल्पलाईन १३९** 511

**विक्री सूचना**
**तिरुपती कमॉडिटीज इम्पेक्स प्रायव्हेट लिमिटेड**
**(सीआयएनः U51420MH2005PTC156397) (परिसमापनामध्ये)**
नोंदणीकृत कार्यालयः कार्यालय क्र. ९०१, ९ वा मजला, लोढा सुप्रिमस, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई, महाराष्ट्र - ४०००१३.

**ई-लिलाव**
**नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ अन्वये मालमत्तेची विक्री**
**लिलावाचा दिनांक आणि वेळ: दि. १० ऑक्टोबर, २०२२ रोजी दु. ३.०० ते सायं. ५.००**

मान. एनसीएलटी, मुंबई खंडपीठाद्वारे दि. ०१ ऑक्टोबर, २०१९ रोजी नियुक्त (आदेश दि. ०१ नोव्हेंबर, २०१९ रोजी प्रसिद्ध) परिसमापक यांच्या ताब्यात असलेल्या तिरुपती कमॉडिटीज इम्पेक्स प्रायव्हेट लिमिटेडच्या परिसमापन संपत्तीचा भाग असलेल्या तिरुपती कमॉडिटीज इम्पेक्स प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये) च्या मालकीच्या संपत्ती आणि मालमत्तांची विक्री. मालमत्तांची विक्री निम्नस्वाक्षरीकारांद्वारे मे. सी१ इंडिया प्रायव्हेट लि. च्या ई-लिलाव प्लॅटफॉर्म https://www.bankeauctions.com द्वारे केली जाईल.

| संपत्तीचे वर्णन | राखीव किंमत | लॉट क्र. | इसारा रक्कम |
|---|---|---|---|
| नियुक्तीद्वारे वित्तीय संपत्ती (ऋणको, अग्रीम आणि इतर वित्तीय संपत्ती) | रु. ७०,००,०००/- (रु. सत्तर लाख मात्र) | १ | रु. ७,००,०००/- (रु. सात लाख मात्र) |

ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे
१. इसारा रक्कम दि. ०७ ऑक्टोबर, २०२२ रोजी सायं. ५ पर्यंत जमा करता येईल.
२. ई-लिलाव "जसे आहे जेथे आहे तत्त्वावर, जसे आहे जे आहे तत्त्वावर, तेथे जे आहे तत्त्वावर आणि कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर" ई-लिलाव सेवा प्रदाता मे. सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेडवर आयोजित करण्यात येईल.
३. संपूर्ण ई-लिलाव प्रक्रिया, संपत्तीचा तपशील, ऑनलाईन ई-लिलाव बोली अर्ज, उद्घोषणा आणि हमी अर्ज, ऑनलाईन लिलाव विक्रीकरिता अटी आणि शर्ती समाविष्ट असलेला प्रक्रिया मसूदा वेबसाईट https://www.bankeauctions.com वर उपलब्ध आहेत. प्रक्रिया मसूदा हा उपरोल्लेखित संपत्तीच्या लिलावाद्वारे विक्रीचा अविभाज्य भाग आहे आणि सर्व कायदेशीर आणि वाणिज्य अटी आणि शर्तींच्या बाबतीत अंतिम प्रपत्र आहे.
४. पात्रता आणि तपशीलवार अटी आणि शर्तींकरिता liqoffice.tcipl@gmail.com आणि vikas.gupta@bngca.com येथे ईमेल पाठवावा आणि ८९५६५६६५१६ येथे संपर्क साधावा.

विकास प्रकाश गुप्ता - परिसमापक
(तिरुपती कमॉडिटीज इम्पेक्स प्रायव्हेट लिमिटेड)
नोंद. क्र.: IBBI/IPA-001/IP-P00501/2017-18/10889
पत्ता: जी-१९, श्रीवर्धन कॉम्प्लेक्स, पोटमाळा मजला, लॅण्डमार्क बिल्डींगजवळ, रामदासपेठ, वर्धा रोड, नागपूर-४४००१०.
ई-मेलः vikas.gupta@bngca.com, liqoffice.tcipl@gmail.com
एएफए वैधता दि. ०१.०२.२०२३ पर्यंत

दिनांक: ३०.०९.२०२२
ठिकाण: नागपूर

**फॉर्म ए**
**जाहीर उद्घोषणा**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)
**एसएनडी लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | एसएनडी लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक | ०३.०४.२०११ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले | आरओसी - मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक / मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | U40300MH2011PLC215684 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | ५१३/ए, ५ वा मजला, कोहिनूर सिटी, किरोल रोड, एल.बी.एस. मार्ग, कुर्ला (प), मुंबई - ४०००७०. |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरु होण्याचा दिनांक | २९.०९.२०२२ (एनसीएलटीच्या वेबसाईटवर आदेश दि. ३०.०९.२०२२ रोजी उपलब्ध करण्यात आला.) |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | २८.०३.२०२३ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | आसिश नारायण नोंद. क्र.: IBBI/IPA-002/IP-N00444/2017-18/11274 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | आसिश नारायण ११ए/५०४, स्प्रिंगलीफ लोखंडवाला, कांदिवली (पू), मुंबई, महाराष्ट्र - ४००१०१. ईमेल : cs.asish@gmail.com |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | आसिश नारायण एसएनडी लिमिटेडच्या प्रकरणात आयआरपी रिसर्जन्ट रिझॉल्यूशन प्रोफेशनल्स एलएलपी ६०३, ६वा मजला, सेन्ट्रल प्लाझा, १६६, सीएसटी रोड, कोलिवेरी गाव, विद्या नगरी, कालिना, सांताक्रुझ पूर्व, मुंबई, महाराष्ट्र-४०००९८. ईमेल : cirp.snd@gmail.com |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | १३.१०.२०२२ |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये धनकोंचे वर्ग, जर असल्यास. | लागू नाही. |
| १३. | वर्गामध्ये धनकोंचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे) | लागू नाही. |
| १४. | (अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल : | https://ibbi.gov.in/en/home/downloads |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ यांनी **दिनांक २९.०९.२०२२** रोजी **एसएनडी लिमिटेड** विरुद्ध कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश दिले आहेत. (आदेश दि. ३०.०९.२०२२ रोजी एनसीएलटी वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला.)
**एसएनडी लिमिटेडच्या** धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे **दि. १३.१०.२०२२** रोजी किंवा त्यापूर्वी पाकिटावर/विषयामध्ये "दावा" असे नमूद करून नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करु शकतात.
**दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.**

सही/-
आसिश नारायण
एसएनडी लिमिटेडचे अंतरिम ठराव व्यावसायिक
नोंदणीकरण क्र.: IBBI/IPA-002/IP-N00444/2017-18/11274

दिनांक: ३०.०९.२०२२
ठिकाण: मुंबई

**फॉर्म ए**
**जाहीर उद्घोषणा**
(भारतीय नादारी आणि दिवाळखोरीपणा मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तींकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ६ अन्वये)
**एस के एस टेक्सटाईल्स लिमिटेडच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता**

| संबंधित तपशील | | |
|---|---|---|
| १. | कॉर्पोरेट कर्जदाराचे नाव | एस के एस टेक्सटाईल्स लिमिटेड |
| २. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या स्थापनेचा दिनांक | २०.१०.१९९७ |
| ३. | प्राधिकरण ज्या अंतर्गत कॉर्पोरेट कर्जदाराची स्थापना/नोंदणीकरण झाले | आरओसी - मुंबई |
| ४. | कॉर्पोरेट कर्जदाराचा कॉर्पोरेट ओळख क्रमांक/ मर्यादित दायित्व ओळख क्रमांक | L17000MH1997PLC111406 |
| ५. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि प्रमुख कार्यालयाचा (जर असल्यास) पत्ता | नोंदणीकृत कार्यालयः एच क्र. १२४६/१के, गाळा: १-९, १ला मजला, इमा. बी-४, पृथ्वी कॉम्प्लेक्स, काल्हेर गाव, ठाणे, महाराष्ट्र ४२१३०२, भारत |
| ६. | कॉर्पोरेट कर्जदाराच्या संदर्भात दिवाळखोरी सुरू होण्याचा दिनांक | २८ सप्टेंबर २०२२ (सीपी(आयबी)क्र.७९९/एमबी-IV/२०२१ मध्ये मान. एनसीएलटी खंडपीठाच्या आदेशानुसार) आदेश दि. ३० सप्टेंबर, २०२२ रोजी प्राप्त झाला) |
| ७. | दिवाळखोरी ठराव प्रक्रिया परिसमाप्तीचा अंदाजित दिनांक | २७ मार्च, २०२३ |
| ८. | अंतरिम ठराव व्यावसायिक म्हणून काम पाहणाऱ्या दिवाळखोरी व्यावसायिकाचे नाव आणि नोंदणीकरण क्रमांक | अनुराग जैन IBBI/IPA-001/IP-P01049/2017-2018/11732 |
| ९. | मंडळाकडे नोंदणीकृत असल्यानुसार, अंतरिम ठराव व्यावसायिकाचा पत्ता आणि ईमेल | नोंदणीकरण कार्यालयः १४०१ ओरिएन्टल हाईट्स, सेक्टर-४४, प्लॉट-१५८ सीवुड्स पश्चिम, नवी मुंबई, महाराष्ट्र ४००७०६. नोंदणीकृत ईमेल आयडीः ipanuragjain@gmail.com |
| १०. | अंतरिम ठराव व्यावसायिकासह पत्रव्यवहाराकरिता वापरावयाचा पत्ता आणि ईमेल | संपर्काचा पत्ताः रिसॉल्व्ह-आयपीई प्रायव्हेट लिमिटेड, १००३, १० वा मजला, सात्रा प्लाझा, सेक्टर १९डी, पाम बीच रोड, वाशी, नवी मुंबई - ४००७०३. प्रक्रिया विशिष्ट ईमेल आयडीः sks@resolvegroup.co.in |
| ११. | दावे सादर करण्याचा अंतिम दिनांक | १२ ऑक्टोबर, २०२२ |
| १२. | अंतरिम ठराव व्यावसायिकाद्वारे निश्चित केल्यानुसार, कलम २१ च्या उप-कलम (६अ) च्या खंड (ब) अन्वये कर्जदारांचे वर्ग, जर असल्यास. | वर्गा(र्गा)चे नाव नमूद करणे लागू नाही |
| १३. | वर्गामध्ये कर्जदाराचा प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता ठरविण्यात आलेल्या दिवाळखोरी व्यावसायिकांची नावे (प्रत्येक वर्गामध्ये तीन नावे) | लागू नाही |
| १४. | (अ) संबंधित अर्ज आणि (ब) अधिकृत प्रतिनिधींचा तपशील उपलब्ध असेल : | वेब लिंकः https://ibbi.gov.in/downloadform.html **भौतिक पत्ताः** वरील क्र. १० मध्ये असल्यानुसार, लागू अर्जाकरिता कृपया टीप क्र. १ पहा. |

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण यांनी दिनांक **२८ सप्टेंबर, २०२२** रोजी **एस के एस टेक्सटाईल्स लिमिटेडची** कॉर्पोरेट दिवाळखोरी ठराव प्रक्रिया सुरु करण्याचे आदेश दिले आहेत.
**एस के एस टेक्सटाईल्स लिमिटेडच्या** धनकोंना याद्वारे त्यांचे दावे पुराव्यासह **१२ ऑक्टोबर, २०२२** रोजी किंवा त्यापूर्वी अंतरिम ठराव व्यावसायिक यांच्याकडे नोंद क्र. १० समोर नमूद पत्त्यावर सादर करण्यास सांगण्यात येत आहे.
वित्तीय धनको यांनी दाव्याबाबतचे त्यांचे पुराव्यासहीत दावे फक्त इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावे. इतर सर्व धनको त्यांचे दाव्याबाबतचे पुरावे व्यक्तिशः, टपालाद्वारे किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करू शकतात.
बाब क्र. १२ समोर नमूद केल्यानुसार वर्गाशी संबंधित असणाऱ्या वित्तीय धनकोंनी फॉर्म सीएमध्ये वर्गाचे प्राधिकृत प्रतिनिधी म्हणून काम करण्याकरिता बाब क्र. १३ समोर दिलेल्या तीन दिवाळखोरी व्यावसायिकांमधून त्यांच्या पसंतीचा प्राधिकृत प्रतिनिधी नमूद करावा.
टीप १:- दाव्याचे सादरीकरण भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (कॉर्पोरेट व्यक्तीकरिता दिवाळखोरी ठराव प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या अध्याय ४ च्या अनुषंगाने करण्यात यावे. पुराव्यांसह दावे खालील निर्दिष्ट अर्जामध्ये दाव्याच्या समर्थनार्थ कागदोपत्री पुराव्यांसह सादर करावे.
फॉर्म बी - कामगार आणि कर्मचारी वगळता कार्यरत धनकोंद्वारे दाव्यांकरिता
फॉर्म सी - वित्तीय धनकोंद्वारे दाव्यांकरिता
फॉर्म सीए - वर्गातील वित्तीय धनकोंद्वारे दावा
फॉर्म डी - कामगार आणि कर्मचाऱ्यांद्वारे दाव्यांकरिता
फॉर्म ई - कामगार आणि कर्मचाऱ्यांच्या प्राधिकृत प्रतिनिधींद्वारे दाव्यांकरिता
फॉर्म एफ - वित्तीय धनको आणि कार्यरत धनकों व्यतिरिक्त धनकोंद्वारे दाव्यांकरिता
**दाव्याबाबतचे चुकीचे किंवा दिशाभूल करणारे दावे सादर केल्यास दंड ठोठावण्यात येईल.**

सीए. अनुराग जैन
दिवाळखोरी व्यावसायिक
**आयबीबीआय नोंदणीकरण क्र.:** IBBI/IPA-001/IP-P01049/2017-2018/11732
**आयबीबीआय नोंदणीकरण ईमेल:** ipanuragjain@gmail.com
एएफए वैधताः १३ डिसेंबर, २०२२
**दिवाळखोरी व्यावसायिक संस्थाः** रिसॉल्व्ह आयपीई प्रायव्हेट लिमिटेड
**आयबीबीआय नोंदणीकरण क्र.:** IBBI/IPE/0120
**संपर्काचा पत्ताः** १००३, १० वा मजला, सात्रा प्लाझा, सेक्टर १९डी, पाम बीच रोड, वाशी, नवी मुंबई - ४००७०३
**प्रक्रिया विशिष्ट ईमेल आयडीः** sks@resolvegroup.co.in

दिनांकः ०१.१०.२०२२
ठिकाणः नवी मुंबई